# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २५/०७/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांना शेतात क्रुरपणे बांधुन ठेवणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत कुसुंबी शिवाराती धापेवाडा ता. कळमेश्वर येथे दिनांक २४/०७/२२ चे १४.०० वा. पुर्वी आरोपी नामे– आरीफ युसुफ शेख वय २८ वर्ष रा. मज्जीद जवळ, धापेवाडा याने मौजा कुसुंबी शिवारातील सुधाकर शंकर कंदे रा. धापेवाडा यांचे शेताचे धुऱ्या वरील झाडाझुडपांना व आशिष रामकृष्ण कोहाड रा. धापेवाडा यांचे विट भट्याजवळ एकुण ३८ जनावरे (गोरे,गायी,बैल) एकुण किंमत १,६३,०००/–रु. चा मुद्देमाल शेताचे धुर्यावरील स्वताचे आर्थिक फायद्यासाठी झाडा झुडपांना दोराने बांधुन त्यांना कोणतीही चारा पाण्याची पर्याय व्यवस्था न करता भर पावसात अंत्यत निर्दयतेने बांधुन त्यांना ईजा पोहचेल किंवा गुदमरून मरेल अशा स्थितीत बांधुन ठेवल्याचे मिळुन आल्याने जप्त केले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक दिनेश गाडगे पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१)(डि) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश पाटील मो.क्र. ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सावनेर चे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मुळूक यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक सतिश पाटील, सहायक फौजदार पांडे, पोलिस हवालदार काकडे, झोडापे, घाडगे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर